नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २४/१०/२०२६ (शनिवार)

मा. मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाने नायलॉन मांजाच्या उत्पादन व पुरवठयाच्या मुळ स्रोतांचा शोध घेतल्याने केली नागपूर ग्रामीण पोलीसांची प्रशंसा

दिनांक ०८/१२/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील कळमेश्वर पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा गोंडखैरी येथील व्ही.आर.एल. लॉजिस्टिक यार्डमध्ये कंटेनर क्रमांक जि.जे २१ वाय ३३१८ मधून प्रतिबंधित नायलॉन मांजाची वाहतूक करणाऱ्या आरोपीला अटक करून १,२०० नग नायलॉन मांजाच्या प्लास्टिक चक्री किंमत १४,४०,०००/— रुपये, तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात आलेला कंटेनर, किंमत २०,००,०००/— रुपये, असा एकूण ३४,४०,०००/—रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. याप्रकरणी कंटेनर चालक छविनाथ मोहन निषाद, वय ३० वर्षे, रा. उत्तर प्रदेश, याच्याविरुद्ध पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा यांच्या नेतृत्वात सहा पोलीस निरीक्षक श्री स्नेहल राउत यांच्या पथकाने पर्यावरणास हानिकारक आणि नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण करणाऱ्या प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या उत्पादन व पुरवठा साखळीविरुद्ध कारवाई करत गोपनीय माहिती, तांत्रिक पुरावे प्राप्त करून सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि बॅकवर्ड लिंकच्या आधारे पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे दाखल गुन्हयासंबंधाने औद्योगिक परिसर, डेमीनी रोड दादरा आणि नगर हवेली येथील सिल्वासा येथे नायलॉन मांजा निर्मितीचा कारखाना उघडकीस आणुन प्रतिबंधित नायलॉन मांजा प्रतिबंधित नायलॉन मांजा, त्याच्या निर्मितीसाठी वापरण्यात येणारी यंत्रसामग्री आणि इतर साहित्य असा एकूण ६ कोटी २६ लाख ४३ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

नायलॉन मांजाच्या पुरवठ्याच्या स्रोतांचा शोध घेण्यासंदर्भात मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्वत:हुन जनहित याचिका (PIL) दाखल करून घेतली होती. त्याबाबत विदर्भातील पोलीस घटकांना

व इतर यंत्रणेला प्रतिज्ञापत्र सादर करण्याबाबत मा. न्यायालयाद्वारे कळविण्यात आले होते. मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांनी त्या संबंधाने मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ येथे सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रावर **मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दि. २३/१०/२०२६ रोजी दिलेल्या आदेशामध्ये नागपूर ग्रामीण पोलीसांनी नायलॉन मांजाच्या स्रोतांचा शोध घेवुन सिल्वासा येथील अंदाजे ६ कोटी रूपये किंमतीचा नायलॉन मांजा व निर्मीतीचा साहीत्य जप्त केल्याबाबत मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण व त्यांच्या पथकाचा मा. न्यायालयाने प्रशंसा केली असुन तपासा दरम्यान नागपूर पोलीसांनी मिळविलेले यश हे कौतुकास्पद आहे असे नमुद केले आहे.** तसेच याचप्रमाणे विदर्भातील इतर जिल्हयाने कारवाई करणे अपेक्षित असुन त्यांना सुद्धा दिनांक २९/१०/२०२६ पर्यंत न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेशित केले आहे.

सावनेर येथील 'रस्त्याच्या मधोमध धोकादायक असलेल्या झाडासंबंधाने नागपूर गामीण जिल्हा पोलींसानी अपघात प्रतिबंध अनुषंगाने केली उपाययोजनात्मक कार्यवाही

पोलीस स्टेशन सावनेर:— सावनेर शहरातून जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या आणि वाहनचालकांच्या जीवितास रस्त्यावर असलेल्या झाडामुळे होणाऱ्या संभावी धोका लक्षात घेवुन नागपूर ग्रामीण पोलीसांनी तात्काळ उपाययोजनात्मक कार्यवाही केली.

रस्त्यावर असलेल्या सदर झाडाचे धोकादायक स्थितीचे गांभीर्य लक्षात घेता मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात सावनेर पोलिसांनी रस्ते अपघातांचा संभाव्य धोका कमी करण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत. त्यामध्ये सावनेर पोलिसांकडून संबंधित ठिकाणी वाहनचालकांना धोक्याची पूर्वसूचना मिळावी, या उद्देशाने झाडाभोवती रिफ्लेक्टर व रेडियम पट्ट्या लावण्यात आल्या असून, रस्त्यावर सुरू असलेल्या कामाच्या पार्श्वभूमीवर वाहनचालकांनी वेग मर्यादित ठेवून सावधगिरीने वाहन चालवावे, यासाठी 'सावधान, काम सुरू आहे' असे सुचनाफलक बसविण्यात आलेले आहे. तसेच रस्त्याच्या मधोमध असलेल्या या झाडामुळे विशेषत: रात्रीच्या वेळी वाहनचालकांना धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. अंधारात झाड स्पष्टपणे न दिसल्यास किंवा समोरून येणाऱ्या वाहनांच्या प्रखर प्रकाशामुळे चालकाचे लक्ष विचलित झाल्यास अपघात होण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण पोलिसांनी तातडीने खबरदारीच्या उपाययोजना करून वाहनचालकांना सतर्क करण्याच्या दृ ष्टीने पावले उचलली आहेत.

अपघात रोखण्यासाठी जनसुरक्षेला प्राधान्य –

रस्ते अपघात टाळण्यासाठी केवळ वाहतुकीचे नियमन करणे पुरेसे नसून, संभाव्य धोकादायक ठिकाणांची ओळख पटवून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सावनेर पोलिसांनी केलेल्या या उपाययोजनांमुळे संबंधित ठिकाणाहून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना धोक्याची पूर्वसूचना मिळण्यास मदत होणार आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत, स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक खबरदारी घेण्याच्या दृष्टिकोनातून पुढाकार घेण्यात आलेला आहे. त्याचबरोबर संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग व वन विभागाशी समन्वय साधून रस्त्यावरील सदर संभाव्य धोका कायमस्वरूपी दूर करण्यासाठी संबंधित विभागाशी समन्वय साधून उपाययोजना करण्यात येत आहेत.

वाहनचालकांना सावधगिरीचे आवाहन–

संबंधित रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी सूचना फलकांचे पालन करावे, वाहनांचा वेग नियंत्रित ठेवावा आणि विशेषत: रात्रीच्या वेळी अधिक सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी संभाव्य धोके ओळखून वेळेत उपाययोजना करणे आणि संबंधित यंत्रणांशी समन्वय साधणे, हा नागपूर ग्रामीण पोलिसांचा जनसुरक्षा दृष्टिकोनाचा महत्त्वाचा भाग आहे.

घरफोडीचे ०२ गुन्हे उघड,
०१ आरोपी अटक, ४ लाख १६ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
स्थानिक गुन्हे शाखा यांची कामगिरी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांच्या नेतृत्वात दिनांक २३/१०/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने . घरफोडीचे ०२ गुन्हे उघड करून ४,१६,०००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उघड न झालेल्या गुन्हयांचा समांतर तपास करीत असतांना त्यांना गोपनिय माहीती प्राप्त झाली की, सदर गुन्हयातील आरोपी प्रविण डेकाटे, रा. नवेगाव बांध, जि. गोंदीया हा असुन तो सध्या मौदा माथनी परिसरात त्याने चोरी केलेले सोन्याचे दागिने विकण्याकरीता फिरत आहे. अशी खात्रीशिर माहीती प्राप्त होताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक पुराव्याचे विश्लेषन करून दिनांक २३/१०/२०२६ रोजी नमुद **आरोपी प्रविण अशोक डेकाटे, वय ३० वर्ष, रा. तिलक वार्ड मोहाडी, ता. मोहाडी, जि. भंडारा, ह. मु. गोपीका**

गजभिये यांचे घरी नवेगाव बांध जि. गोंदीया याला माथनी टी पॉईंट येथुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता त्याचे पॅटचे खिशात सोन्याचे दागिने मिळुन आले. त्यास सदर सोन्याचे दागिने बाबत नमुद आरोपीला कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने १२ दिवसाआधी मौदा परिसरात घरफोडी केल्याचे सांगितले. तसेच ०१ महिन्याआधी पोस्टे उमरेड हद्दीत दिवसा घरफोडीचा गुन्हा केल्याची माहीती दिली.

पोलीसांनी आरोपींच्या ताब्यातुन पंचासमक्ष पिवळया व पांढऱ्या धातुचा ऐवज असा **एकुण ४,१६,०००/— रूपयांचा** मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीला अटक करण्यात आली आहे.

उघड गुन्हे

1) पोलीस स्टेशन मौदा अप क्र . 693/2026 कलम 305(अ),331(3) भा.न्या.स.
2) पोलीस स्टेशन उमरेड अप.क्र. 934/2026 कलम 305(अ) भा.न्या.स

मानवाच्या खाण्यास अयोग्य सुपारीची वाहतुक करणाऱ्या ४ वाहनांसह अंदाजे ४० टन सुपारी घेतली ताब्यात
वडोदा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन वडोदा :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. शशांत एन. एम. सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी कन्हान विभाग यांच्या मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक श्री मनोज गदादे प्रभारी अधिकारी वडोदा, नागपुर ग्रामीण यांच्या नेतृत्वात दिनांक २४/१०/२०२६ रोजी वडोदा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन वडोदा हद्दीतील महालगाव–लिगाव परिसरातील नवकर वेअरहाऊस येथे विनापरवाना व मानवाच्या खाण्यास अयोग्य सुपारी चार वाहनांमधून आणण्यात येत आहे. अशी माहीती प्राप्त होताच वडोदा पोलीसांनी नमुद घटनास्थळी सापळा रचुन रेड कारवाई करून सदर ठिकाणी वाहनांची तपासणी केली असता एकुण चार वाहनांमध्ये अंदाजे ४० टन मानवाच्या खाण्यास अयोग्य सुपारी' आढळून आली. पोलिसांनी सदर चारही वाहने ताब्यात घेतली असून, पुढील कायदेशीर कारवाईच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासन विभागाला पत्रव्यवहार करण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाकडुन शहानिशा झाल्यानंतर पुढील कार्यवाहीची तजविज आहे.

अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन अरोली :– दिनांक २३/१०/२०२६ रोजी अरोली पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता **आरोपी नामे तुशार उर्फ नाईन्टी तुळसीदास वानखेडे, वय ३० वर्ष, रा. संताजी नगर कन्हान, तह. पारशिवनी, जि. नागपूर** हा मौजा रंगोली बार येथे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरतांना मिळुन आला. त्याचे नाव व गाव विचारले असता त्याने उडवा उडवीचे उत्तरे दिली. नमुद आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर १५ गुन्हे दाखल,

दिनांक २३/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण १५ गुन्हे दाखल केले.

पोलीस स्टेशन खापा येथे आरोपी नामे १. गणेश विनोद नेवारे, वय २३ वर्ष, रा. घरकुल कॉलोनी खापा, ता. सावनेर, जि. नागपूर २. विलास केशव मडके, वय ५८ वर्ष, रा. नवीन वस्ती खापा ३. शंकर पंचम सिरसाम, वय ७० वर्ष, रा. कोरमेटा, ता. सावनेर, जि. नागपूर ४. महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे गजानन वासुदेव घुगल, वय ३६ वर्ष, रा. खैरी ढालगाव, ता. सावनेर, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १. गौरव कृष्णाजी चौधरी, वय ३५ वर्ष, रा. वाघोडा २. महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे मनोज गुलाब कंगाली, रा. विनोबा भावे वार्ड, रामटेक याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे १. रामचंद्र क्रिस्तीया गड्डमवार, वय ५९ वर्ष, रा. रेल्वे स्टेशन जवळ बुटीबोरी २. चंद्रप्रकाश ऊर्फ चंदू वासूदेव वासे, वय ४८ वर्ष, रा. सातगाव दुधाळा यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे संजय रामु धुर्वे, वय ५२ वर्षे, रा. शेमडा, ता. नरखेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे संदीप नौखीलाल मेहिदोले, वय ३६ वर्ष, रा. परसोडी दिक्षित याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे १.

जालंदर हरीचंद ढोक, वय ३५ वर्ष, रा. भिवापुर २. वनवास गुलाब गायमुखे, वय ३५ वर्ष, रा. तास, ता. भिवापुर, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ नोंद.

नमुद कारवाईत एकुण ३२२३० मिली देशी दारू, ३६० मिली विदेशी दारू, २४ लीटर मोहाफुल दारू असा एकुण ८०६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६६२ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २४/१०/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६६२ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

नागपुर उपविभाग :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे २८ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे २९ आरोपी अशा एकुण ८६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

उमरेड उपविभाग :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४४ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २२ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २५ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १२४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

सावनेर उपविभाग :— सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३८ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १४ आरोपी, अशा एकुण १३६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

कन्हान उपविभाग :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन मौदा येथे १९ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १७ आरोपी अशा एकुण ६९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

रामटेक उपविभाग :— रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २६ आरोपी अशा एकुण ११० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

काटोल उपविभाग :— काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४२ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २६ आरोपी अशा एकुण १३७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.






LEVI'S



जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर